# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २६२९२१०२

तार - EDUTECH E-mail :- desk12@dte.org.in internet :- http://www.dte.org.in


---

तात्काळ

क्रमांक : १/डिटीई/आढावा बैठक/२०१२/ ९२

दिनांक : 5 OCT 2012

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती व नागपूर.

२) संचालक / सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

**विषय : <u>आढावा बैठक दिनांक १६.१०.२०१२</u>**

तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या विविध विषयांबाबतची सद्यःस्थिती व कामाच्या प्रगतीबाबत सहसंचालक आणि तंत्रशिक्षण मंडळातील अधिकारी यांची आढावा बैठक दि. १६.१०.२०१२ रोजी सकाळी ११.०० वा. संचालनालयात आयोजित करण्यांत आली आहे.

**-: बैठकीची विषयसूची :-**

१. शासनाकडून विशेष बाब म्हणून प्राप्त परवानगीच्या अनुषंगाने गट क व गट ड मधील पद भरती संदर्भातील सद्यस्थिती.
२. दिनांक २५.७.२०१२ चे सामान्य प्रशासन विभागाचे निर्देश विचारात घेता उर्वरित पदांवर करावयाची पद भरती.
३. गट क व गट ड मधील पदांची बिंदू नामावली मंजूर करुन घेण्याबाबतची सद्यःस्थिती.
४. दिनांक १ जानेवारी, २०१२ पर्यंतच्या सेवा जेष्ठता याद्या प्रसिध्द करणे.
५. गोपनीय अहवाला संबंधात प्राप्त होणाऱ्या प्रतिवेदनावर करावयाची कार्यवाही.
६. अनुदानित संस्थांमधील अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन व रिक्त पद भरती प्रक्रियेबाबतची कार्यवाही.
७. शासकीय व अनुदानित संस्थामधील मागासवर्गीय अनुशेष आणि अपंग आरक्षणाची पदे भरण्यासंदर्भातील सद्यःस्थिती.
८. शासकीय व अशासकीय संस्थामधील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकीय संवर्गातील अधिकाऱ्यांचे समायोजन.
९. अद्यापपर्यंत ६ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करता न आलेल्या शिक्षकीय / समकक्ष पदासंबंधात करावयाची कार्यवाही.
१०. सन २०१२ च्या नियतकालीक बदली आदेशाची अंमलबजावणी.
११. अपंगांसाठी संस्थेमध्ये पुरवावयाच्या साधन सुविधा व सहाय्यक यंत्रसामुग्री / उपकरणे.


सहसंचालक तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय, अमरावती
आवक क्र. ५०८५ दिनांक ०८/१०/१२

१२. शासकीय संस्थांना सहसंचालकांनी दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने आढळलेल्या त्रुटींबाबत करावयाची कार्यवाही.

१३. ग्रंथालय व व भांडार पडताळणी बाबतची सद्य:स्थिती.

१४. ई.बी.सी. संदर्भात आढळून आलेली अनियमितता व त्या अनुषंगाने शासनाकडील चौकशीच्या अनुषंगाने विभागीय कार्यालयाकडून करण्यात आलेली कार्यवाही.

१५. ई.बी.सी. अंतर्गत शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्तीकरिता सन २०१२-१३ व १३-१४ या आर्थिक वर्षामध्ये आवश्यक असलेल्या निधीबाबतचे स्वयंस्पष्ट प्रस्ताव.

१६. आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये विभागीय कार्यालया अधिनस्त येणाऱ्या शासकीय संस्थांना प्रशासकीय मान्यता असलेल्या व अर्थसंकल्पात समाविष्ठ करावयाच्या कामाची यादी.

१७. मुलींच्या वसतीगृहासाठी शासकीय तंत्रनिकेतनाना प्राप्त निधीचे संस्था स्तरावर नियोजन व उपयोगिता प्रमाणपत्र.

१८. चालू अर्थ संकल्पात समाविष्ठ असलेल्या बांधकामावर झालेल्या खर्चाचा तपशील व भौतिक अहवाल.

१९. संस्थानिहाय यंत्रसामुग्री व साधन सामुग्रीबाबत प्रलंबित देयकांची यादी.

२०. सन २०१३-१४ या वर्षासाठी शासकीय संस्थाना योजनांतर्गत व योजनेत्तर उपलेखाशिर्षनिहाय आवश्यक निधीची मागणी व त्याबाबतचे आवश्यक समर्थन.

२१. अनुदानित संस्थांचे मूल्यनिर्धारण.

२२. लेखा व भांडार पडताळणीतील मागील आक्षेपांची पूर्तता व त्यानुषंगाने केलेल्या अनुपालनाबाबतची कार्यवाही.

२३. विना अनुदानित संस्थेतील शिक्षकीय व शिक्षकेत्तर पदांवर नियुक्ती संदर्भातील कार्यवाही.

२४. शासकीय व शासन अनुदानित संस्थांच्या विकास निधी अंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावातील त्रुटी.

२५. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अतंर्गत मुख्य माहिती आयुक्तांकडून प्राप्त झालेल्या सूचनांची अंमलबजावणी.

२६. प्रवेश व फी परतावा संबंधात प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष या नात्याने सहसंचालक स्तरावर करावयाची कार्यवाही.

२७. शासकीय संस्थामध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमासाठी पद मंजूरीतील तफावती संदर्भात करावयाची कार्यवाही.

२८. शासकीय संस्थामधील पद निर्मिती व पद भरती अभावी प्रवेश न दिलेल्या अभ्यासक्रमा संदर्भात करावयाची कार्यवाही.

२९. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचेकडून वेळोवेळी प्राप्त निर्देशाच्या अनुषंगाने संचालनालय व मंडळ कार्यालय यांच्यामध्ये साधावयाचा समन्वय.

३०. राज्य प्रशिक्षण धोरणाची अंमलबजावणी.

३१. प्रवेश याद्या पडताळणी / मंजूरीबाबतची कार्यवाही.

आवश्यक वाटल्यास आपले स्तरावर संस्था प्रमुख व क्षेत्रीय अधिकाऱ्यांची तात्काळ बैठक आयोजित करुन विषय सूचीतील मुद्देनिहाय माहिती व स्वयंस्पष्ट टिप्पणीसह आपण बैठकीस व्यक्तीश: उपस्थित रहावे.

( डॉ. सुभाष महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्र.क्र./विज्ञअ/आस्था/आठवा वेतन/२०१२/२६२२
दिनांक ८/१०/२०१२

प्रतिलीपी :-

प्राचार्य, शासकिय अभि. महा अमरावती/शा. औषध निर्माण शास्त्र महा अमरावती
प्राचार्य, शासकिय तंत्रनिकेतन अमरावती/यवतमाळ/वाशिम/खामगाव/मुर्तिजापूर/महिला शिवणी तंत्रनिकेतन यवतमाळ
डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन अमरावती
सीतादेवी खंडेलवाल इन्स्टीट्यूट ऑफ फार्मसी मेडळा।
त्यांना कळविण्यात येते कि आठवा वेतननिश्चिती दि १०/१०/२०१२ या कार्यालयात प्राचार्यांची सभा दि १०/१०/२०१२ रोजी आयोजीत करण्यात येत आहे. तरी आपले संस्थेशी संबंधीत मुद्द्यांची माहितीसह संबंधित दि १०/१०/२०१२ रोजी वेळ ११=०० (११.००) वाजता उपस्थीत रहावे.

सहसंचालक
तंत्र शिक्षण, अमरावती